ePaper

"आम्ही दुसऱ्या पक्षात गेलो नाही, आम्ही शिवसेनेतच"; दिल्लीतून शिंदेंचा ठाकरेंवर निशाणा



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 03 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

शहरातील तब्बल ६ लाख मतदार 'आउट'!

## AI तंत्रज्ञानाच्या मदतीने माजी एअर मार्शल मिश्रा यांची निवड

# राममंदिर ट्रस्टचे सीईओ जितेंद्र मिश्रा

महाईन्यूज | अयोध्या

**अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण फेरबदल करण्यात आले आहेत. भारतीय हवाई दलाचे माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची ट्रस्टचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच तीन नव्या विश्वस्तांचीही निवड करण्यात आली आहे.**




ट्रस्टमधील तीन जागा रिक्त झाल्यानंतर अयोध्येत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महेश भागचंदका, मदन मोहन पांडे आणि निर्मल यादव यांच्या नावांना मंजुरी देण्यात आली. भागचंदका हे 'एम२के फाऊंडेशन'चे अध्यक्ष आणि अशोक सिंघल फाऊंडेशनचे विश्वस्त आहेत. पांडे हे राम जन्मभूमी खटल्याशी संबंधित वकील असून विश्व हिंदू परिषदेशी निगडित आहेत. तर निर्मल यादव यांना ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व म्हणून संधी देण्यात आली आहे.

CEO पदासाठी तब्बल ५,५८५ अर्ज प्राप्त झाले होते. प्राथमिक छाननीनंतर १६ उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड झाली. त्यानंतर अंतिम तीन उमेदवारांमधून जितेंद्र मिश्रा यांची निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मॅन्युअल स्क्रिनिंगचा वापर करण्यात आला. दिल्ली-एनसीआर, पुणे आणि संबलपूर येथील तांत्रिक पथकांनी उमेदवारांची छाननी केली. ऑनलाइन संवादानंतर अयोध्येत प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या.

मंदिराचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि आधुनिक पद्धतीने करण्यासाठी CEO पदाची निर्मिती करण्यात आल्याचे मानले जात आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या व्यक्तीची निवड करण्यावर भर देण्यात आला.

दरम्यान, या फेरबदलावरून समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी सरकारवर निशाणा साधला. राममंदिरातील देणगी चोरीच्या आरोपांचा संदर्भ देत त्यांनी, यापुढे 'रामधनाची' चोरी होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच अयोध्येच्या विकासाच्या नावाखाली स्थानिकांच्या जमिनी बळकावल्याचा आरोपही त्यांनी केला.

### राममंदिर ट्रस्टमध्ये नवे चेहरे!

माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची पहिले CEO म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, महेश भागचंदका, मदन मोहन पांडे आणि निर्मल यादव यांची नव्या विश्वस्त म्हणून निवड झाली आहे. CEO पदासाठी तब्बल ५,५८५ अर्ज आले होते. निवड प्रक्रियेत AI आणि मॅन्युअल स्क्रिनिंगचा वापर करण्यात आला.

### 'रामधनाची चोरी होणार नाही अशी आशा': अखिलेश यादव यांचा टोला



दुसरीकडे, राममंदिर ट्रस्टच्या या महत्त्वाच्या बैठकीवरून राजकीय वातावरण तापले आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी पत्रकारांशी बोलताना भाजप सरकार आणि मंदिर प्रशासनावर जोरदार निशाणा साधला. "अयोध्यात नव्या घडामोडी घडत असल्या तरी आपण जुन्या घटना विसरू शकतो का? आम्हाला कुणाबद्दल वैयक्तिक तक्रार नाही, पण ज्या प्रकारे देणगीची चोरी झाली ती गंभीर बाब आहे. या प्रकरणात सामान्य कर्मचाऱ्यांना तुरुंगात धाडण्यात आले, पण बड्या नावांना सोडून देण्यात आले. आता तरी 'रामधनाची' (देणगीची) चोरी होणार नाही, अशी आम्ही आशा करतो," असा टोला अखिलेश यादव यांनी लगावला. तसेच अयोध्येचा जागतिक स्तरावर विकास होण्याऐवजी भाजप नेत्यांच्या हावेपोटी तिथल्या स्थानिक गरिबांच्या जमिनी बळकावण्यात आल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

# चाकणच्या रस्त्यांवरील अतिक्रमणांना ‘ब्रेक’!

## एमआयडीसीची धडक कारवाई; ८५ अतिक्रमणे जमीनदोस्त, आणखी तीन टप्प्यांत मोहीम

महाईन्यूज । पुणे

**चाकण औद्योगिक क्षेत्रात अनेक ठिकाणी रस्त्यांवर अतिक्रमण झाले आहे. या अतिक्रमणांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कोंडीत भर पडते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पोलीस संरक्षणात अतिक्रमणांवर कारवाईची धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत आतापर्यंत ८५ अतिक्रमणे पाडण्यात आली असून, रस्त्यांवरील रहदारीतील अडथळे दूर करण्यात आले आहेत. यामुळे पुणे-नाशिक महामार्गासह तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाने मोकळा श्वास घेतला असून, चाकणमधील वाहतुकीचा वेग आता वाढणार आहे.**



चाकण औद्योगिक क्षेत्रातील खराब आणि खड्डेमय रस्ते, वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांची दुरवस्था हे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. येथील लघुउद्योगांनी स्थलांतराचा इशारा दिल्यानंतर सरकारी पातळीवर वेगाने हालचाली सुरू होऊन येथील प्रश्न सोडविण्याची पावले पडू लागली आहेत. शासकीय यंत्रणांकडून रस्ते दुरुस्तीच्या कामांना वेग देण्यात आला आहे. चाकण परिसरातील मुख्य रस्त्यांवर अनेक ठिकाणी अतिक्रमण करून दुकाने थाटण्यात आली आहेत. भंगार दुकाने, चहाच्या टपरी, हॉटेल, मिठाईची दुकाने, गॅरेजसाठी हे अतिमक्रमण करण्यात आले आहे. त्यांच्यावर कारवाईची मोहीम ‘एमआयडीसी’ने पोलीस संरक्षणात हाती घेतली आहे.

या बाबत ‘एमआयडीसी’चे कार्यकारी अभियंता प्रकाश भंडांगे म्हणाले, “एमआयडीसी’ने चाकण परिसरातील सुमारे १५० अतिक्रमणांना आधी नोटिसा बजावून कारवाईचा इशारा दिला. त्यानंतर या अतिक्रमणांवर ३० ऑगस्टपासून कारवाई सुरू करण्यात आली. चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्रमांक दोनमधील ८५ अतिक्रमणांवर दोन दिवसांत कारवाई करून ती हटविण्यात आली. आता टप्पा क्रमांक एक, तीन आणि चारमध्ये अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात येणार आहे. ही अतिक्रमणे काढण्यास व्यावसायिकांचा विरोध होण्याची शक्यता गृहित धरून पोलीस संरक्षणाची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांकडून संरक्षण मिळाल्यानंतर ही कारवाई केली जाईल.’

### उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

‘चाकण परिसरातील अतिक्रमण काढताना कोणाचीही गय करू नये. शासकीय यंत्रणांनी अतिक्रमणांवर कठोर कारवाई करावी,’ असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गेल्या आठवड्यात दिले. ‘स्थानिकांनीही या कारवाईला विरोध न करता प्रशासनाला सहकार्य करावे,’ असे आवाहन त्यांनी केले होते. त्यानंतर शासकीय यंत्रणांकडून अतिक्रमणांचा प्रश्न प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे.

# गणेशोत्सवात ध्वनिक्षेपकांवर पोलिसांचा ‘सर्जिकल स्ट्राइक’!



महाईन्यूज । पुणे

**‘धडकी भरविणाऱ्या ‘प्रेशर मिड’, ‘प्लाझ्मा साउंड’ या उपकरणांचा ध्वनिक्षेपक यंत्रणेत वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. नियम धुडकाविल्यास मंडळांविरुद्ध थेट गुन्हे दाखल करून यंत्रणा जप्त करण्यात येईल,’ असा इशारा पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी मंगळवारी दिला. मात्र, ध्वनिक्षेपक यंत्रणेत चार ‘बास’, चार ‘टॉप’ वापराला परवानगी दिल्याचेही स्पष्ट केले.**

पोलीस आयुक्त म्हणाले, ‘गणेशोत्सवासाठी ध्वनिक्षेपकांबाबत नियमावली निश्चित करण्यात आली आहे. मंडळांना ध्वनिक्षेपक यंत्रणेत चार बास आणि चार टॉप वापरास परवानगी आहे. मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही याला सहमती दर्शविली आहे. पण, मंडळांनी ध्वनिक्षेपकांची संख्या वाढविल्यास थेट ध्वनिक्षेपक यंत्रणा जप्त करण्यात येईल.’

दरम्यान, पुणे पोलीस आणि विघ्नहर्ता न्यासाच्या वतीने शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना अमितेशकुमार यांनी, ‘नियम पालन करून गणेशोत्सव साजरा करण्याचा ‘पुणे पॅटर्न’ तयार करू या,’ असे आवाहन केले. ते म्हणाले, ‘ध्वनिवर्धकांमुळे सामान्य नागरिक त्रस्त आहेत. पुणेकरांना आता बदल हवा आहे. पुणेकर नागरिक नियमांचे पालन करणारे असून, सर्वांना सोबत घेऊन दिमाखदार गणेशोत्सव साजरा करू या.’

‘न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. पुणेकर नागरिक नियम पाळतात. ते शिस्तप्रिय आहेत. दहीहंडी, गणेशात्सवात उच्च क्षमतेच्या ध्वनिक्षेपक यंत्रणेचा वापर करू नये. त्यामुळे आरोग्यावर परिणाम होतो. म्हणूनच सर्वांनी नियमांचे पालन करावे. पोलीसही त्यासाठी आग्रही असतील,’ असे अमितेशकुमार यांनी नमूद केले.

ते म्हणाले, ‘गणेशोत्सवात नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांचे पोलिसांकडून स्वागत केले जाणार आहे. मात्र, नियम धुडकाविणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. ईद-ए-मिलादच्या दिवशी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत ध्वनिक्षेपकांबाबत दिलेल्या नियमांचे पालन करण्यात आले. नियम न पाळणाऱ्यांच्या ध्वनिक्षेपक यंत्रणा जप्त करण्यात आल्या. पोलीस दल यापुढेही नियमांच्या अधीन राहून काम करील.’

### दहीहंडी, विसर्जन सोहळ्यावर लक्ष

‘दहीहंडी उत्सव, गणेश विसर्जन मिरवणूक या प्रसंगी मंडळे उच्च क्षमतेची ध्वनिक्षेपक यंत्रणा वापरतात. यंदा मर्यादेचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई करण्यात येईल. मंडळांनी छुप्या पद्धतीने ध्वनिक्षेपक लावल्यास गुन्हे दाखल करून यंत्रणा जप्त करण्यात येणार आहे. पोलीस ध्वनिक्षेपक यंत्रणेची प्रत्यक्ष तपासणी करणार आहेत,’ अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

### लेझर झोतांवर बंदी

पुणे जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या कालावधीत तसेच विसर्जन मिरवणुकीमध्ये लेझर झोतांचा वापर करण्यास मनाई करण्याचा आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मंगळवारी जाहीर केला. लेझर झोतामुळे नागरिकांच्या डोळ्यांना इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे हा आदेश काढण्यात आला आहे. ‘या आदेशाचा भंग करून लेझर झोताचा वापर करताना आढळून आल्यास अशा व्यक्ती, संस्था, मंडळे यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल,’ असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# शहरातील तब्बल ६ लाख मतदार 'आउट'!

## पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतील प्रारूप मतदार यादीत मोठे बदल

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघांतील प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झाली असून, विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेत तब्बल सहा लाख ८ हजार ९२७ मतदारांची नावे वगळली आहेत. त्यामुळे शहरातील एकूण १७ लाख २४ हजार ५३७ मतदारांपैकी ११ लाख १५ हजार ६१० मतदार राहिले आहेत. नागरिकांना ३० सप्टेंबरपर्यंत पडताळणी व दुरुस्तीची विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.**



शहरात पिंपरी, चिंचवड आणि भोसरी असे तीन विधानसभा मतदार संघ आहेत. मतदारसंघनिहाय आकडेवारीचा विचार करता, चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ६ लाख ८७ हजार ४४८ मतदारांपैकी तब्बल २ लाख ७० हजार २३ मतदार वगळले आहेत. त्यामुळे चिंचवडमध्ये ४ लाख १७ हजार ४२५ मतदार राहिले आहेत, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी संदीप खोत यांनी दिली. पिंपरी विधानसभा मतदारसंघात ४ लाख १ हजार १७५ मतदारांपैकी १ लाख ६५ हजार ६९७ मतदार वगळले आहेत. २ लाख ३६ हजार २८७ मतदारांची नावे यादीत राहिली आहेत, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी अर्चना यादव यांनी दिली. तसेच सुनावणी घेण्यासाठी ३८ ठिकाणे निश्चित केल्याचेही त्यांनी सांगितले.

भोसरी मतदारसंघात ६ लाख ३५ हजार ११४ पैकी १ लाख ७३ हजार २०७ मतदार यादीतून वगळण्यात आले आहेत. त्यामुळे आता भोसरीत ४ लाख ६१ हजार ९०७ मतदारांचा समावेश असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी सचिन पाटील यांनी दिली. निवडणूक विभागाने नागरिकांना १ ते ३० सप्टेंबर या महिनाभराच्या कालावधीत दावे व हरकती दाखल करण्याचे आवाहन केले आहे. या कालावधीत प्राप्त अर्जांचे २१ ऑक्टोबरपर्यंत निवारण करून ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

प्रारूप यादीत नाव नसल्यास नागरिकांनी घाबरून न जाता नवीन नाव नोंदणीसाठी नमुना ६ आणि दुरुस्तीसाठी नमुना ८ अर्ज भरावा. तसेच नावाचे स्पेलिंग, नातेवाईकांचे नाव, जन्मतारीख, लिंग, छायाचित्र, पत्ता, ईपीआयसी क्रमांक यादीत आहे का, याची अचूक पडताळणी करून घ्यावी. आगामी निवडणुकीत मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वेळेत आपल्या व कुटुंबातील सदस्यांच्या नावाची खात्री करणे आवश्यक आहे.

### मतदारसंघनिहाय SIRचे चित्र

चिंचवड विधानसभा मतदारसंघात एकूण ६ लाख ८७ हजार ४४८ मतदारांपैकी २ लाख ७० हजार २३ मतदारांची नावे वगळण्यात आली असून, आता ४ लाख १७ हजार ४२५ मतदार राहिले आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघात ४ लाख १ हजार १७५ मतदारांपैकी १ लाख ६५ हजार ६९७ नावे वगळण्यात आली असून, आता २ लाख ३६ हजार २८७ मतदार यादीत आहेत. दावे-हरकतींच्या सुनावणीसाठी ३८ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. भोसरी विधानसभा मतदारसंघात ६ लाख ३५ हजार ११४ मतदारांपैकी १ लाख ७३ हजार २०७ मतदारांची नावे वगळण्यात आली असून, प्रारूप यादीत आता ४ लाख ६१ हजार ९०७ मतदारांचा समावेश आहे.

# महापालिकेतील १३ आरोग्य निरीक्षकांची नोकरी धोक्यात!




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शासनाची मान्यता नसल्याने ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट या संस्थेचे प्रमाणपत्राद्वारे पिंपरी-चिंचवड महापालिकेस आरोग्य निरीक्षकांची नोकरी मिळणारे 13 जणांची नियुक्ती बेकायदा ठरण्यात आले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेने कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे त्यांची नोकरी धोक्यात आली आहे.**

कोणतीही शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. मात्र, ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट यासह राज्यातील शंभरहून अधिक संस्थांवर अनधिकृत संस्था अधिनियमानुसार कारवाई सुरू आहे, असे महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाने न्यायालयाला कळवले. त्यावरून उच्च न्यायालयाने महापालिकेच्या 13 आरोग्य निरीक्षकांची नियुक्ती बेकायदा ठरवली आहे.

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट या संस्थेमार्फत चालवले जाणारा आरोग्य निरीक्षक अभ्यासक्रम पूर्णपणे अनधिकृत आहे. त्याला शासनाची मान्यता नसल्याचे उघड झाले आहे. या संस्थेच्या मुंबईसह ठाणे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नांदेड येथील शाखांना कोणतीही शासकीय परवानगी नाही. तरीही, संस्थेने आरोग्य निरीक्षक नावाखाली हजारो विद्यार्थ्यांना प्रवेश देवून लाखो रुपये शुल्क घेतले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये आरोग्य सेवक, आरोग्य निरीक्षक या पदावर अशीच प्रमाणपत्रे घेऊन नोकरी मिळवली आहे. त्यांच्या आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेले असून, पालकांमध्ये रोष आहे.

### एका उमेदवाराला बाद केल्याने अनधिकृत संस्थेचे बिंग फुटले

पिंपरी-चिंचवड महापालिकेने 30 ऑगस्ट 2024 रोजी आरोग्य निरीक्षक या पदाच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यात चेतन बोरसे या उमेदवाराने मराठवाडा विकास मंडळाकडून आरोग्य निरीक्षक हा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. संभाजीनगर येथील मराठवाडा व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत चालविला जाणारा आरोग्य निरीक्षक हा अभ्यासक्रम अनधिकृत असल्याने महापालिकेने त्याला सांगितले. त्यामुळे चेतन बोरसे याने मुंबई येथील उच्च न्यायालयात धाव घेतली. त्याप्रकरणाच्या सुनावणीत ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंट ही संस्था अनधिकृत संस्था अआहे. सन 2013 च्या अधिनियमनुसार त्या संस्थेवर कारवाई सुरू आहे, असे शासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे ती संस्था अनधिकृत असल्याचे उघड झाले.

### खातेनिहाय चौकशी करणार

मुंबई उच्च न्यायालयाच्या निकाल महापालिका प्रशासनाला प्राप्त झाला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार 13 आरोग्य निरीक्षकांची खातेनिहाय चौकशी सुरू करण्यात येणार आहे. त्या प्रकरणी योग्य ती कारवाई केली जाईल, असे महापालिकेचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.



## भूमिका

# कांदे-बटाट्यांसाठी अब्जावधींची गुंतवणूक!



**तंत्रज्ञानाच्या जगात अब्जावधी डॉलरची उलाढाल करणारे उद्योगपती आता शेतीच्या मातीत हात मळवताना दिसत आहेत, ही बाब वरकरणी आकर्षक वाटली तरी तिच्यामागे अनेक गंभीर आर्थिक प्रश्न दडलेले आहेत. मार्क झुकरबर्ग, बिल गेट्स, जेफ बेझोस यांच्यासारख्या धनाढ्यांनी अमेरिकेत हजारो-लाखो एकर शेतजमीन खरेदी केल्याची चर्चा आहे.**

कुणी पशुपालन, कुणी मधमाशीपालन, तर कुणी विविध पिकांच्या लागवडीकडे वळले आहे. मात्र, या श्रीमंतांचा 'शेतीप्रेम' आणि सामान्य शेतकऱ्यांची शेती यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे.

सामान्य शेतकरी शेतीकडे उपजीविकेचे साधन म्हणून पाहतो. पाऊस, बाजारभाव, उत्पादन खर्च, कर्ज, मजुरी, वीज आणि नैसर्गिक आपत्ती अशा असंख्य संकटांचा सामना करून तो अन्नधान्य पिकवतो. दुसरीकडे, अब्जाधीशांसाठी शेतजमीन ही जीवनशैलीबरोबरच सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय ठरू शकते. त्यामुळे जमीन खरेदी करण्याची आर्थिक क्षमता ज्यांच्याकडे प्रचंड आहे, त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर जमीन विकत घेतली गेल्यास भविष्यात छोट्या शेतकऱ्यांसाठी जमीन उपलब्धतेचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो.

शेतजमीन ही केवळ मालमत्ता नाही; ती अन्नसुरक्षेचा पाया आहे. जमिनीच्या वाढत्या किमतीमुळे शेतीत नव्याने प्रवेश करू इच्छिणाऱ्या तरुणांसमोर अडथळे निर्माण होतात. मोठ्या भांडवलदारांकडे जमीन आणि संसाधने एकवटली, तर कृषी क्षेत्रातील विषमता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतीचा ताबा काही मोजक्या धनिकांच्या हातात जाणे ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक चिंतेची बाब आहे.

यातील दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे भविष्यातील तंत्रज्ञानाची गरज. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, ऊर्जा प्रकल्प आणि पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर जमीन लागणार आहे. त्यामुळे आजची शेतजमीन उद्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञानाच्या विस्तारासाठी वापरली जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतीयोग्य जमीन वाचवणे आणि तिचा योग्य वापर सुनिश्चित करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

शेतीत मोठ्या भांडवलाचा प्रवेश पूर्णपणे चुकीचा आहे, असेही म्हणता येणार नाही. आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन, साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेशी थेट जोडणी यामुळे कृषी क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. मात्र, त्याचा लाभ सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे.

अब्जाधीश कांदे-बटाटे पिकवत आहेत, ही गंमत वाटणारी बातमी आहे; पण त्यातून शेतीच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न समोर येतो. जमीन ही श्रीमंतांसाठी गुंतवणुकीची संधी असली, तरी सामान्य माणसासाठी ती अन्ननिर्मितीची जीवनरेखा आहे. त्यामुळे शेतीचे व्यापारीकरण नव्हे, तर शेतकऱ्याचे सक्षमीकरण हेच कृषी धोरणाचे केंद्र असायला हवे.

## प्रासंगिक »

# लोभाचा शेवट

**एका गावाजवळून एक नदी वाहत होती. नदीकाठची वाळू बांधकामासाठी उपयुक्त असल्याने तिची मागणी मोठी होती. गावातील रघूला वाळू विकून झटपट पैसे कमावण्याची हाव लागली. त्याने रात्रीच्या वेळी नदीतून वाळू काढण्यास सुरुवात केली.**

सुरुवातीला त्याला भरपूर पैसा मिळाला. त्यामुळे त्याचा लोभ वाढत गेला.

गावातील एका वृद्धाने त्याला समजावले, "नदीची वाळू म्हणजे केवळ पैसा नाही. ती नदीच्या अस्तित्वाचा आधार आहे. तिची लूट केलीस तर उद्या नदीच संकटात येईल."

रघूने त्याचे बोलणे दुर्लक्षित केले. काही दिवसांनी मुसळधार पाऊस झाला. वाळूचा अतिउपसा झाल्यामुळे नदीकाठची जमीन खचली आणि अनेक शेतांमध्ये पाणी शिरले. रघूचे स्वतःचे शेतही वाहून गेले. त्याने कमावलेला पैसा काहीच उपयोगी पडला नाही.

रघूला आपली चूक समजली. त्याने गावकऱ्यांची माफी मागून वाळू तस्करी कायमची सोडली. पुढे तो नदी संवर्धनाच्या कामात सहभागी झाला."

- तात्पर्य : लोभातून मिळवलेला पैसा क्षणिक असतो; निसर्गाचे नुकसान मात्र कायमचे महागात पडते.

राजकारणाची रणभूमी आता केवळ सभा, मोर्चे आणि प्रचारफेऱ्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. मोबाइलच्या पडद्यावरही मतदारांच्या मनाची लढाई सुरू झाली आहे.

# नॅरेटिव्हच्या नव्या रणांगणात भाजप



भाजपच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना बदलत्या राजकीय प्रचारतंत्राची जाणीव करून देताना सोशल मीडियावर अधिक सक्रिय होण्याचा दिलेला संदेश याच वास्तवाचे प्रतिबिंब आहे.

विरोधकांकडून निर्माण होणाऱ्या 'नॅरेटिव्ह'ला उत्तर देण्यासाठी पारंपरिक प्रचारपद्धतीपेक्षा डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे. आज एखाद्या नेत्याचे तासभराचे भाषण किती लोक ऐकतील, याची खात्री नसते; मात्र काही सेकंदांची रील लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते.

त्यामुळे राजकीय संवादाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. विशेषतः तरुण मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी इन्स्टाग्राम, यूट्यूब, फेसबुक आणि इतर डिजिटल माध्यमे प्रभावी साधने बनली आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या बदलाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. मात्र, सोशल मीडियावरील ही लढाई जिंकताना भाजपसमोर मोठे आव्हानही आहे.

विरोधकांचा 'फेक नॅरेटिव्ह' म्हणून प्रत्येक टीकेकडे पाहणे योग्य नाही. सरकारच्या कामावर प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्यातील तथ्य तपासून उत्तर द्यावे लागेल.

चुकीची माहिती असेल तर पुराव्यांसह ती खोडून काढावी लागेल आणि प्रश्न खरा असेल तर त्याचे उत्तरही द्यावे लागेल. केवळ आक्रमक भाषेत आरोप-प्रत्यारोप करून विश्वास निर्माण होत नाही. डिजिटल माध्यमांचा वेग मोठा आहे; पण त्याच वेगाने अफवाही पसरतात. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या हातात मोबाइलसोबत विवेकही असणे गरजेचे आहे.

'नॅरेटिव्ह'च्या लढाईत सत्य मागे पडले, तर कोणत्याही पक्षाचे नुकसान होऊ शकते. राजकीय प्रचाराचा उद्देश मतदाराला प्रभावित करणे असला, तरी त्याला चुकीची माहिती देणे हा लोकशाहीवरील विश्वास कमकुवत करणारा मार्ग ठरेल. निवडणूक प्रत्यक्षात मतपेटीत जिंकली जाते; पण तिची मानसिक तयारी मतदाराच्या मनात आधीच सुरू होते. आज त्या मनापर्यंत पोहोचण्याचा सर्वात वेगवान मार्ग मोबाइल आहे.

त्यामुळे भाजपने डिजिटल प्रचाराला महत्त्व देणे ही काळाची गरज असली, तरी मोबाइलवरील लोकप्रियतेपेक्षा विश्वासार्हता महत्त्वाची आहे. आवाज मोठा करण्यापेक्षा तथ्यांचा आवाज बुलंद करणे आवश्यक आहे. कारण रील मतदाराचे लक्ष वेधू शकते; पण मतदानाच्या क्षणी त्याचा निर्णय अनुभव, कामगिरी आणि विश्वासावरच ठरतो.

## ।। अभंगवाणी ।।



माझी पाठ करा कवी ।
उट लावी दारोदार ॥१॥

तंव तया पारखी सिव ।
लाजे ठाव सांडितां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्राध्यापक भरतीचे भवितव्य न्यायालयाच्या हाती!

## भरती प्रक्रियेविरोधात याचिका; डिसेंबरपूर्वी नियुक्त्यांवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज । पुणे**

**गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील प्राध्यापक भरती आता पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने भरती प्रक्रियेला वेग दिल्यानंतर या प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे डिसेंबरपूर्वी भरती प्रक्रिया पूर्ण होण्याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.**



राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये रिक्त असलेल्या सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या भरतीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली होती. गुणवत्तापूर्ण उमेदवारांची निवड करण्यासाठी शैक्षणिक संशोधन, अध्यापनातील कामगिरी आणि मुलाखत यावर आधारित गुणपद्धती निश्चित करण्यात आली होती.

सुरुवातीला शैक्षणिक संशोधन व अध्यापनासाठी ८० आणि मुलाखतीसाठी २० गुण असे सूत्र निश्चित करण्यात आले होते. त्यावर विविध संघटनांनी आक्षेप घेत UGCच्या निकषांनुसार भरती प्रक्रिया राबविण्याची मागणी केली. त्यानंतर हे सूत्र बदलून ७५-२५ करण्यात आले. त्यावरही आक्षेप नोंदवण्यात आल्यानंतर अखेर ६०-४० असे गुणांचे सूत्र निश्चित करण्यात आले.

या निकषांनुसार विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी आणि उमेदवारांची पात्रता पडताळणी पूर्ण करण्यात आली असून, अनेक ठिकाणी मुलाखती सुरू झाल्या आहेत. सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या मुलाखती जवळपास पूर्ण झाल्या आहेत. मात्र, सहायक प्राध्यापक पदांसाठी उमेदवारांची संख्या मोठी असल्याने या मुलाखती आणखी काही काळ सुरू राहणार आहेत.

दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ११ फेब्रुवारीच्या शासन निर्णयाविरोधात औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर राज्य शासनाने आपली भूमिका मांडली असून, विद्यापीठ अनुदान आयोगाकडूनही भूमिका मांडली जाणार आहे. सद्यस्थितीत न्यायालयाने पात्र उमेदवारांची निवड यादी जाहीर न करण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायालयाच्या पुढील आदेशावरच प्राध्यापक भरतीचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना आणखी प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे. परिणामी, विद्यापीठांमधील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया आणि त्यातून शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या अपेक्षांनाही पुन्हा विलंब होण्याची चिन्हे आहेत.

### भरतीला न्यायालयीन ब्रेक

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांची भरती प्रक्रिया सुरू असतानाच उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. पात्र उमेदवारांची निवड यादी जाहीर न करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याने भरती प्रक्रिया पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

# व्हीआयपी गाडीसाठी कष्टकऱ्याची सायकल फेकली!

**महाईन्यूज । मुंबई**

**व्हीआयपी व्यक्तीच्या वाहनाला मार्ग करून देण्यासाठी वाहतूक पोलिस कर्मचाऱ्याने सायकलवरून ओझे घेऊन जाणाऱ्या व्यक्तीची सायकल उचलून फेकल्याचा व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या प्रकारामुळे व्हीआयपी संस्कृती आणि सामान्य नागरिकांशी होणाऱ्या कथित दुजाभावावरून संताप व्यक्त केला जात आहे.**

### व्हिडीओमुळे व्हीआयपी संस्कृतीवर चर्चा

व्हीआयपी वाहनासाठी रस्ता मोकळा करताना सामान्य नागरिकाची सायकल फेकल्याचा दावा असलेल्या या व्हिडीओमुळे समाजमाध्यमांवर संतापाची लाट उसळली आहे.
नियम सर्वांसाठी समान असावेत आणि सामान्य नागरिकांशीही सन्मानाने वागले पाहिजे, अशी प्रतिक्रिया नेटकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



व्हायरल व्हिडीओ हा पी. डी'मेलो रोड, कार्नाक बंदर, मुंबई येथील असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, व्हिडीओच्या घटनास्थळाबाबत अधिकृतपणे स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. व्हिडीओमध्ये वाहतूक पोलिस कर्मचारी रस्त्याच्या मधोमध असलेले पिवळे बॅरिकेड्स हटवून एका व्हीआयपी वाहनाला यू-टर्न घेण्यासाठी मार्ग करून देताना दिसत आहे.

व्हीआयपी वाहन आणि त्यामागील पोलिस वाहन पुढे गेल्यानंतर मागून येणाऱ्या प्रवासी वाहनाला मात्र त्याच मार्गाने जाण्यास पोलिस कर्मचाऱ्याकडून मज्जाव करण्यात आल्याचे व्हिडीओमध्ये दिसते. याचदरम्यान सायकलवरून ओझे घेऊन जाणाऱ्या व्यक्तीची सायकल पोलिस कर्मचाऱ्याने बाजूला फेकल्याचेही दिसत आहे.

व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शिवसेनेचे राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनी मुंबई पोलिसांना टॅग करत संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

व्हीआयपी व्यक्ती कोणीही असो, काम करणाऱ्या सामान्य व्यक्तीशी अशा प्रकारे वागणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रत्येक नागरिकाचा सन्मान राखला पाहिजे आणि अशा प्रकारची घटना पुन्हा घडू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी देवरा यांनी केली आहे.

दरम्यान, हा व्हिडीओ इन्स्टाग्राम, फेसबुक, एक्ससह विविध समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. व्हिडीओवर प्रतिक्रिया देताना अनेक नेटकऱ्यांनी व्हीआयपी संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, सामान्य नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळावी, अशी मागणी केली आहे.

# गोठ्यात चालणारी ‘ती’ शाळा अखेर पाडली

## १८ लाख खर्चून सरकार बांधणार नवी इमारत; CJP कार्यकर्त्यांवर इथेच झाला होता हल्ला

**महाईन्यूज । जयपुर**

**जयपुरमधील एका शाळेच्या दुरावस्थेची पाहणी करण्यासाठी गेलेल्या सीजेपीच्या कार्यकर्त्यांवर गेल्या महिन्यात हल्ला झाल्याची घटना समोर आली. जयपुरमधील रामपुरा कंवरपुरा गावातील सरकारी शाळेची जीर्ण झालेली ती इमारत अखेर बुधवारी पाडण्यात आली. राज्य सरकारने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, इथं आता १८ लाख रुपये खर्च करून नवीन इमारत बांधली जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी कॉक्रोच जनता पार्टीचे कार्यकर्ते स्कूल ठीक करो अभियानाअंतर्गत या शाळेला भेट देण्यासाठी आले असता त्यांच्यावर हल्ला झाला होता.**



“शाळेची पाहणी करण्यासाठी गेलो असता आमच्यावर दगडफेक करण्यात आली, महिलांवर हल्ले झाले आणि गाड्यांच्या काचाही फोडण्यात आल्या. पण मुलांसाठी चांगली शाळा बांधली जाईल, तेव्हा या सर्व त्रासाचे चीज होईल,” असे रांका यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे.

सरकारकडून शाळेची इमारत नव्याने बांधली जात असल्याने स्थानिकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे. येथील स्थानिक नागरिक लालचंद शर्मा यांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत, असुरक्षित इमारत पाडणे आणि नवीन इमारत बांधणे हा सकारात्मक बदल असल्याचे हिंदुस्थान टाईम्सशी बोलताना म्हटले आहे. शाळेशी निगडीत गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटना अयोग्य असल्याचे नमूद करताना शर्मा यांनी शाळा ज्ञानाचे मंदिर असून त्याचे राजकारण न करण्याचे आवाहन केले.

बागरू विधानसभा मतदार संघात येणाऱ्या या शाळेला सप्टेंबर २०२५ मध्ये धोकादायक शाळा म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यामुळं ही शाळा वापरात नव्हती. तेव्हापासून या शाळेतील १८ विद्यार्थ्यांचे वर्ग हे गावातील पत्र्याच्या शेडमध्ये भरत होते. त्याच भागात म्हैशी देखील बांधल्या जात होत्या.

### सीजेपीच्या कार्यकर्त्यांवर हल्ला

दरम्यान, सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी २१ ऑगस्ट रोजी शाळेला भेट दिली असता त्यांच्यावर काही जणांनी हल्ला केला होता. या घटनेमुळे राज्य सरकारवर टीका झाली होती. या घटनेनंतर दोनच दिवसांनी, म्हणजेच २३ ऑगस्ट रोजी राजस्थान सरकारने नवीन शाळा इमारतीसाठी निधी जाहीर केला. सरकारी आदेशानुसार शाळा दुरुस्तीसाठी एकूण निधी १८ लाख रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे.

### गोठ्यात चालवली जात होती शाळा

सरकारने शाळेची इमारत नव्याने बांधण्याची घोषणा केल्यानंतर सीजेपीने त्यांच्या मोहिमेच विजय असल्याचे म्हटले आहे. सरकारी शाळांची दुरवस्था सुधारण्याचे उद्दिष्ट असलेल्या अभियानाचा हा विजय असल्याचे कॉक्रोच जनता पार्टीने म्हटले आहे. २१ ऑगस्ट रोजी झालेल्या हल्ल्यात सीजेपीचे सह-संयोजक आशुतोष रांका जखमी झाले होते. ही शाळा म्हशींच्या गोठ्यात चालवली जात होती, असा आरोप सीजेपीकडून करण्यात आला होता.

# ‘मी युक्रेन युद्ध संपवलं तर ते मला फासावर लटकवतील’; पुतिन

**महाईन्यूज । रशिया**

**रशिया आणि युक्रेन यांच्यात फेब्रुवारी २०२२ रोजी युद्धाला सुरुवात झाली. चार वर्षांपासून युद्ध सुरू असून अजूनही त्यातून तोडगा निघालेला नाही. दरम्यान नुकत्याच झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी हे न संपणारे युद्ध आता कायमचे संपवावे, असे आवाहन रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना केले होते. मात्र डोन्बास प्रांत ताब्यात घेण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय पूर्ण केल्याशिवाय युद्ध संपवले, तर मला फासावर लटकवले जाईल, अशी भीती पुतिन यांना वाटत आहे.**



द इकॉनॉमिस्टने दिलेल्या वृत्तामध्ये म्हटल्यानुसार, डोन्बास ताब्यात न घेता युद्ध संपवल्यास रशियाच्या उच्चभ्रू वर्गाकडून पुतिन यांची सत्ता उलथवून लावली जाऊ शकते. क्रेमलिनमधील सूत्रांचा हवाला देऊन या वृत्तात म्हटले की, पुतिन यांनी त्यांना फासावर लटकवले जाऊ शकते, अशी भीती व्यक्त केली.

द इकॉनॉमिस्टने दिलेल्या बातमीनुसार, वाटाघाटी करून संघर्ष थांबवल्यास ते दुबळेपणाचे लक्षण ठरेल, असे पुतिन यांना वाटते आणि दुबळा नेता रशियात तग धरू शकत नाही. त्यामुळेच संघर्षात तडजोड करणारे त्यांना परवडणारे नाही.

या वृत्तात पुढे लिहिल्यानुसार, पुतिन नजीकच्या काळात युक्रेनवरील हल्ले आणखी तीव्र करू शकतात किंवा युक्रेनच्या पुढे जाऊन युद्धाची व्याप्ती वाढवू शकतात. जाणकारांच्या मते, आता पुतिन अशा परिस्थितीत आहेत की, त्यांच्याकडे फारसे पर्याय उपलब्ध नाहीत आणि त्याचवेळी हे वृत्त समोर आले आहे.

जाणकारांच्या मते जवळपास पाच वर्षे युद्ध चालल्यानंतर आता एकतर विजय किंवा वैयक्तिक पराभव याशिवाय कोणताही मार्ग पुतिन यांच्याकडे उरला नाही. युद्ध सुरू ठेवणे हे रशियासाठी आता आव्हानात्मक होत चालले आहे. युक्रेनकडून लांब पल्ल्याचा हल्ला केला जात असून ऊर्जा प्रकल्पाला लक्ष्य केले जात आहे. यामुळे आर्थिक ताण, सामान्य लोक आणि उच्चभ्रू वर्गातील नाराजी वाढत चालली आहे.

दरम्यान, रशियाच्या लष्करी आणि आर्थिक क्षमतेवरही या दीर्घकाळ चाललेल्या युद्धाचा परिणाम होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. युद्ध थांबवण्याचा निर्णय घेतल्यास पुतिन यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, युद्ध अधिक तीव्र केल्यास रशियावरील आर्थिक आणि राजनैतिक दबाव वाढू शकतो. त्यामुळे पुतिन यांच्यासमोर विजय मिळवण्याची किंवा संघर्ष आणखी वाढवण्याचीच रणनीती उरल्याचे विश्लेषण केले जात आहे.

### डोन्बास महत्त्वाचा का?

डोन्बास हा पूर्व युक्रेनमधील एक महत्त्वाचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक प्रदेश आहे. युक्रेनच्या दोनेत्स्क आणि लुहान्स्क या दोन प्रांतांना जोडून हा प्रांत बनला आहे. युक्रेनचा औद्योगिक कणा म्हणून डोन्बासची ओळख आहे. या प्रांतात कोळसा, लोह-पोलादच्या खाणी आहेत. रशियाचे या परिसरावर ९० टक्के नियंत्रण आहे. उरलेल्या १० टक्के भागावर नियंत्रण मिळवण्यासाठी पुतिन यांचे प्रयत्न सुरू आहेत.

आगामी काळात पुतिन कोणता निर्णय घेतात, यावर रशिया-युक्रेन युद्धाची पुढील दिशा अवलंबून राहणार आहे.

# जौहर वरून पुन्हा वादंग



बॉलीवूड अभिनेत्री स्वरा भास्कर पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात आणि चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. तिच्या जौहर किंवा सती जाण्याच्या वक्तव्यावरून ती पुन्हा वादात सापडली आहे. सोशल मीडियावर तिची एक व्हिडिओ क्लिप व्हायरल होत आहे. या क्लिपमध्ये दावा केला जात आहे की स्वराने राणी पद्मावती आणि जौहर करणाऱ्या दुसऱ्या महिलांना भ्याड म्हटलं होतं. आता या संपूर्ण वादावर स्वराची संतप्त प्रतिक्रिया आली आहे. स्वरा भास्करने तिच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढला अन् भाषांतर केलं असं सांगितलं. तिचे वक्तव्य तोडून मोडून सादर करून एक खोटी गोष्ट पसरवली जात आहे. स्वरा भास्कर म्हणाली की, मी काही तरी बोलले होते. ते अत्यंत चुकीच्या पद्धतीने अनुवादित करण्यात येत आहे. स्वराने तिने कधीही राणी पद्मावती या भ्याड होत्या. किंवा महालातील इतर दुसऱ्या राण्या ज्यांनी जौहर केला त्या भ्याड होत्या असं म्हटलं नाही. मी स्पष्टपणे सांगू इच्छिते की मी कधीही राणी पद्मावती यांना भ्याड म्हटलं नाही. स्वराने आपल्या व्हिडिओत आपण जे काही बोललो त्याचा हिंदीमध्ये काय अर्थ होतो हे सांगितलं. तिने सोशल मीडियावर ट्रोल करणाऱ्यांवर देखील आगपाखड केली. तिने कोणाला जर भाषा समजत नसेल तर त्यांनी आधी विचारलं पाहिजे. माहिती करून घेतलं पाहिजे की खरं काय आहे. काही माहिती नसताना चुकीच्या पद्धतीने गोष्टी पसरवणे योग्य नाही. स्वरा म्हणाली की जे लोक मला शिव्या देऊ इच्छितात त्यांनी द्याव्यात मात्र योग्य गोष्टींवर लक्ष द्या. स्वराने पद्मावत चित्रपटाचा क्लायमॅक्स पाहताना तिला काय वाटलं हे सांगितलं होतं. त्यावेळी त्यांनी चित्रपटाचा शेवट पाहताना मला वाटलं होतं की जर देव न करो पण ती स्वतः बलात्काराची शिकार झाली असती तर कदाचित मी स्वतःचा जीव दिला नाही या गोष्टीवर मला भ्याडपणा वाटला असता. स्वराने आपले म्हणणे समजून सांगताना म्हटलं की, ज्यावेळी मी चित्रपटाचा क्लायमॅक्स पाहत होते त्यावेळी मला वाटलं की देव न करो पण जर मी बलात्काराची शिकार झाले असते आणि त्यानंतर मी स्वतःला मारलं नसतं तर मी स्वतःला भित्री समजले असते. स्वराने आपण अशा एका समाजात राहतोय जिथं बलात्कार संस्कृती वेगाने फोफावत आहे.

# 'सैयारा'नंतर अनीत पड्डाचा नवा अवतार!



सैयारा' या चित्रपटातून रातोरात लोकप्रिय झालेली अभिनेत्री अनीत पड्डा आता एका वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनीतच्या आगामी वेब सीरिज 'हुंकार'चा दमदार टीझर नुकताच रिलीज झाला आहे. या सीरिजमध्ये अनीत एका १७ वर्षांच्या विद्यार्थिनीची भूमिका साकारताना दिसणार आहे. तर अभिनेत्री फातिमा सना शेख पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. टीझर पाहिल्यानंतर सीरिजची कथा नेमकी काय आहे, याबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. 'हुंकार'च्या टीझरची सुरुवात अनीत पड्डाच्या व्यक्तिरेखेपासून होते. तिचं नाव मीनू रावत असं असून ती स्वतःला १७ वर्षांची विद्यार्थिनी सांगते. टीझरमध्ये मीनू पोलिस स्टेशनमध्ये बसलेली दिसते. ती पोलिसांसमोर आपल्यासोबत घडलेल्या एका गंभीर घटनेची माहिती देताना दिसते. मीनू एका प्रभावशाली व्यक्तीवर गंभीर आरोप करते. या व्यक्तीचं नाव बापजी असल्याचं टीझरमधून समोर येतं. मीनू त्याच्यावर चुकीचं वागल्याचा आणि मारहाण केल्याचा आरोप करते. त्यामुळे हे प्रकरण नेमकं काय आहे आणि त्यामागचं सत्य काय, हा प्रश्न टीझर पाहताना निर्माण होतो. या प्रकरणाचा तपास करण्याची जबाबदारी फातिमा सना शेखने साकारलेल्या पोलिस इन्स्पेक्टरवर सोपवण्यात येते. फातिमाचा पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेतील अंदाज टीझरमध्ये प्रभावी दिसतो. तपास सुरू झाल्यानंतर बापजीशी संबंधित अनेक गोष्टी हळूहळू समोर येताना दिसतात. त्यामुळे या प्रकरणामागे आणखी काही मोठं गूढ दडलं आहे का, याची उत्सुकता वाढते.



# ईशा देओलचे कमबॅक!

बॉलिवूड अभिनेत्री ईशा देओल पुन्हा एकदा पुन्हा मनोरंजन विश्वात कमबॅक करण्यासाठी सज्ज झाली आहे. बॉलिवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, ईशा देओलने 'मालामाल वीकली २' हा सिनेमा साइन केला आहे. ईशा व्यतिरिक्त 'बिग बॉस १७' ची स्पर्धक आणि अभिनेत्री सोनिया बन्सलने देखील या चित्रपटात दिसणार आहे. सिनेमाच्या निर्मात्यांनी सोनियाला एका रंजक भूमिकेची ऑफर दिली. ही भूमिका आवडल्यामुळे सोनियानेही या प्रोजेक्टमध्ये काम करण्यास होकार दिला आहे. रिपोर्ट्सनुसार, 'मालामाल वीकली २'च्या शूटिंगला नोव्हेंबर २०२६ पासून सुरुवात होऊ शकते. या सिनेमाची कथा पहिल्या भागापेक्षा वेगळी असेल, मात्र सिनेमाचा मूळ विनोदी अंदाज कायम ठेवण्यात येणार आहे. सिनेमात एका छोट्या शहराची कथा दाखवली जाणार आहे. 'मालामाल वीकली २'चे दिग्दर्शन 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया'चे दिग्दर्शक अमित जोशी करत आहेत. याआधी वृत्त आले होते की, या चित्रपटात रवीना टंडन आणि परिणीती चोप्रासारख्या अभिनेत्रीही दिसणार आहेत. याशिवाय, अभिनेत्री शिल्पा शिरोडकर, अभिनेते राजपाल यादव आणि एल्विश यादव देखील चित्रपटात असल्याची चर्चा आहे. दरम्यान, २००६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मालामाल वीकली' सिनेमात दिवंगत अभिनेते ओम पुरी यांच्यासोबत परेश रावल, रितेश देशमुख आणि राजपाल यादव यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसले होते. आता या लोकप्रिय कॉमेडी फ्रँचायझीच्या दुसऱ्या भागात ईशा देओल आणि सोनिया बन्सल यांची एन्ट्री होणार आहे. ईशा शेवटची 'रुद्र: द एज ऑफ डार्कनेस' या वेब सीरिजमध्ये दिसली होती. ही सीरिज २०२२ मध्ये जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित झाली होती. यानंतर आता ती नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.



# CPL मध्ये खेळाडूंमध्ये हायव्होल्टेज ड्रामा!

## OUT झालेला फलंदाज पुन्हा मैदानात उतरला अन् सामना जिंकून दिला

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**वेस्ट इंडिजमध्ये सध्या कॅरेबियन प्रीमियर लीग स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत आतापर्यंत चौकार- षटकार आणि रेकॉर्ड्सचा पाऊस पाहायला मिळाला आहे. पण मंगळवारी झालेल्या सामन्यात जे काही घडलं , ते पाहून सर्वांनाचा आश्चर्याचा धक्का बसला. या सामन्यात बार्बाडॉस ट्रायडंट्स आणि सेंट किट्स अँड्स नेव्हिस हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. क्रिकेटमध्ये फलंदाज बाद झाला आणि त्याने एकदा मैदान सोडलं की सोडलं, मग तो पुन्हा फलंदाजीला येऊ शकत नाही. पण या सामन्यात भलतंच काही घडलं.**



तर झाले असे की, बार्बाडोसचा संघ या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. प्रथम फलंदाजी करताना या संघाने २० षटकांअखेर ४ गडी बाद २१७ धावा केल्या. बार्बाडोस संघाकडून फलंदाजी करताना क्विंटन डीकॉकने सर्वाधिक १०६ धावांची खेळी केली. तर झॅकरी कार्टरने ५७ धावा केल्या. तर शेरफेन रुदरफोर्डने शेवटी फलंदाजी करताना अवघ्या १६ चेंडूंमध्ये २६ धावांची खेळी केली.

हा सामना सेंट किट्स अँड्स नेव्हिस संघाने ६ गडी आणि ५ चेंडू राखून आपल्या नावावर केला. यादरम्यान जॉन्सन चार्ल्स सेंट किट्स अँड्स नेव्हिस संघाच्या विजयाचा हिरो ठरला. या सामन्यात त्याने ४५ चेंडूंचा सामना करत ७८ धावांची खेळी केली. पण जॉन्सन चार्ल्स आणि आपल्या फलंदाजीमुळे कमी आणि विकेटमुळे जास्त चर्चेत राहिला. तर झाले असे की, डावातील चौथ्या षटकात रॅमोन सायमंड्स गोलंदाजीला आला. या षटकात सायमंड्सने टाकलेला फुलटॉस चेंडू जॉन्सनने स्क्वेअर लेगच्या दिशेने मारला, चेंडू हवेत गेला आणि रुदरफोर्डने झेल घेतला. तो बाद झाला पण सेंट किट्स अँड्स नेव्हिस संघातील खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली. त्यांना वाटत होतं की हा नो बॉल आहे. त्यामुळे तिसऱ्या पंचांची मदत घेतली. रिप्ले पाहिल्यानंतर तिसऱ्या पंचांनीही त्याला बाद घोषित केलं.

खेळाडूंनी गोंधळ घातल्यानंतर, पंचांनी पुन्हा एकदा नो बॉल तपासून पाहिला. रिप्लेमध्ये नो बॉल असल्याचं स्पष्ट झालं. त्यामुळे बाद घोषित करण्यात आलेला चार्ल्स पुन्हा मैदानात आला आणि त्याने आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

### संघातील खेळाडूंचा आरडाओरडा

तिसऱ्या पंचांनी बादचा निर्णय दिल्यानंतर सेंट किंट्स अँड्स नेव्हिस संघातील खेळाडूंनी डगआऊटमधूनच संताप व्यक्त केला. पंचांनी व्हिडीओ पुन्हा एकदा तपासून पाहावा आणि मगच काय तो निर्णय द्यावा, यासाठी सेंट किंट्स अँड्स नेव्हिस संघातील खेळाडूंनी आरडाओरडा सुरू केला. पण आधी बाद घोषित केल्यानंतर चार्ल्सने मैदान सोडलं होतं. तरीदेखील सेंट किंट्स अँड्स नेव्हिस संघातील खेळाडू त्याला पुन्हा मैदानात जा असं सांगताना दिसून आले. खेळाडूंनी गोंधळ घातल्यानंतर, पंचांनी पुन्हा एकदा नो बॉल तपासून पाहिला. रिप्लेमध्ये नो बॉल असल्याचं स्पष्ट झालं.

## जेतेपदासाठी इशान किशन विरुद्ध तिलक वर्मा यांच्यात चुरस रंगणार

**महाईन्यूज । बेंगळुरू**

**दुलीप करंडक २०२६ च्या अंतिम लढतीचे चित्र आता पूर्णपणे स्पष्ट झाले आहे. दुसऱ्या उपांत्य फेरीत साउथ झोनने नॉर्थ झोनचा ७ गडी राखून पराभव करत दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली. यापूर्वी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात सेंट्रल झोनला नमवून इशान किशनच्या नेतृत्वाखालील ईस्ट झोनने आधीच अंतिम फेरीतील स्थान निश्चित केले होते.**



त्यामुळे ६ सप्टेंबरपासून चेन्नईच्या प्रतिष्ठित एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर रंगणाऱ्या अंतिम सामन्यात तिलक वर्माचा साउथ झोन आणि इशान किशनचा ईस्ट झोन यांच्यात जेतेपदासाठी काट्याची टक्कर पाहायला मिळणार आहे. २३ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या या स्पर्धेत दोन्ही संघांनी सातत्यपूर्ण कामगिरी करत ही मजल मारली आहे.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात नॉर्थ झोनचा पहिला डाव अवघ्या १७५ धावांवर आटोपला. नॉर्थ झोनकडून कामरान इक्बालने सर्वाधिक ७६ धावा केल्या, तर साउथ झोनच्या विदवथ कवेरप्पाने अचूक मारा करत ४ बळी टिपले. या प्रत्युत्तरात साउथ झोनने कर्णधार तिलक वर्माच्या नाबाद ११६ धावांच्या शतकी खेळीच्या आणि श्रेयस गोपाळच्या ८७ धावांच्या बळावर पहिल्या डावात ३१२ धावा रचून १३७ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. नॉर्थ झोनकडून गुरनूर ब्रारने ४ गडी बाद केले. त्यानंतर दुसऱ्या डावात नॉर्थ झोनने सनत सांगवानच्या ७६ आणि आयुष दोसेजाच्या ५२ धावांच्या जोरावर २९७ धावा उभ्या केल्या. साउथ झोनच्या एम.डी. निधिशने ५६ धावांत ५ फलंदाजांना माघारी धाडले.

विजयासाठी मिळालेल्या १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना साउथ झोनची सुरुवात दमदार झाली. रिकी भुई (४२) आणि एन. जगदीशन (४३) यांनी ६४ धावांची सलामी दिली. शेख रशीद (१) स्वस्तात बाद झाल्यानंतर डावाची सूत्रे कर्णधार तिलक वर्मा आणि समरण रविचंद्रन यांनी हाती घेतली. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ८० धावांची अतूट भागीदारी करत संघाला विजय मिळवून दिला. पहिल्या डावात शतक झळकावणाऱ्या तिलक वर्मने दुसऱ्या डावातही ७९ चेंडूंत ८ चौकारांसह नाबाद ५१ धावांची संयमी खेळी साकारली.

### ईस्ट झोनच्या फलंदाजांचे वर्चस्व

या स्पर्धेतील सर्वोच्च वैयक्तिक खेळींच्या क्रमवारीत ईस्ट झोनच्या फलंदाजांचे वर्चस्व दिसून येत आहे. १६७ धावांची खेळी करणारा शाहबाज अहमद अव्वल स्थानी असून, १४६ धावांसह सुदीप कुमार घारामी दुसऱ्या क्रमांकावर आहे. उपांत्य फेरीतील नाबाद ११६ धावांच्या जोरावर तिलक वर्मा तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. चौथ्या स्थानी ९६ धावांसह मुशीर खान, तर पहिल्या उपांत्य फेरीत सेंट्रल झोनविरुद्ध ९२ धावांची खेळी करणारा वैभव सूर्यवंशी पाचव्या क्रमांकावर आहे. याशिवाय श्रेयस गोपाळ (८७ धावा), सनत सांगवान (७६ धावा) आणि ऋतुराज गायकवाड (६६ धावा) यांचाही प्रमुख फलंदाजांच्या यादीत समावेश आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY


महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।
दि. 03 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# अप्पू घरच्या मुदतवाढीपूर्वी सुरक्षिततेची खात्री करा

## प्रस्तावित उपक्रम, खेळणी, सुरक्षा व्यवस्था आणि परवानग्यांचे सादरीकरण करण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील प्रसिद्ध अप्पू घर अम्युजमेंट पार्क प्रकल्पाला मुदतवाढ देण्यापूर्वी प्रस्तावित प्रकल्पाची संपूर्ण माहिती, सुरक्षितता आणि नियोजनाची खात्री करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न सिताराम काटे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी २८ ऑगस्ट २०२६ रोजी आयुक्तांना पत्र देऊन सदर प्रकल्पाबाबत तूर्तास कोणतीही मुदतवाढ देऊ नये, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरातील अप्पू घर हे अनेक वर्षांपासून नागरिकांच्या आणि विशेषतः लहान मुलांच्या आकर्षणाचे पर्यटन व मनोरंजनस्थळ आहे. या प्रकल्पामध्ये मनोरंजनात्मक खेळणी, वॉटर पार्क तसेच विविध सुविधांचा समावेश करण्यात आला होता. कोरोना काळात प्रकल्प बंद राहिल्याने त्या कालावधीची मुदतवाढ देण्यासंदर्भात तसेच प्रकल्पाला दीर्घ मुदतवाढ देण्याबाबत महापालिका स्तरावर हालचाली झाल्या आहेत. मात्र, प्रकल्पाला दीर्घ मुदतवाढ देण्यापूर्वी नेमके काय नवीन विकसित केले जाणार आहे, याची स्पष्टता आवश्यक असल्याचे काटे यांनी म्हटले आहे.

अम्युजमेंट पार्कमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक आणि लहान मुले येत असल्याने सुरक्षिततेच्या निकषांमध्ये कोणतीही तडजोड होता कामा नये, असे काटे यांनी पत्रात नमूद केले आहे. प्रस्तावित साधनांची गुणवत्ता व ग्राह्यता कोण निश्चित करणार? कोणत्या नोंदणीकृत कंपन्यांची उपकरणे व प्रॉडक्ट वापरले जाणार? त्यांची गुणवत्ता तपासणी कशी होणार? शासनाच्या आवश्यक सुरक्षा परवानग्या कोणत्या असतील आणि त्या मिळविण्याचे नियोजन काय आहे? यासह विविध प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.

### प्रस्तावित उपक्रमांची माहिती सार्वजनिक करा

अप्पू घरमध्ये भविष्यात कोणते नवीन उपक्रम सुरू केले जाणार आहेत? कोणत्या प्रकारची मनोरंजनात्मक खेळणी अथवा साहसी उपक्रम विकसित केले जाणार आहेत? या प्रकल्पाचे नियोजन कोण करीत आहे? प्रकल्पासाठी वास्तुविशारद, डिझायनर किंवा विशेष तज्ज्ञ सल्लागार कोण आहे? या बाबींची माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण शहरातील प्रमुख नेते, विविध राजकीय पक्षांचे मान्यवर आणि संबंधित क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींसमोर करण्यात यावे, अशीही भूमिका त्यांनी मांडली आहे.

अशा स्वरूपाच्या मोठ्या मनोरंजन प्रकल्पासाठी विशेष अनुभव असलेल्या आर्किटेक्ट, डिझायनर तसेच संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती अथवा संस्थांचा अधिकृत सल्ला घेणे आवश्यक असल्याचे काटे यांनी स्पष्ट केले आहे. प्रकल्पाची संपूर्ण माहिती, नियोजन आणि सुरक्षा व्यवस्था निश्चित झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारची मान्यता, अंमलबजावणी किंवा कामाचे आदेश देऊ नयेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, अप्पू घर हा शहराच्या दृष्टीने महत्त्वाचा पर्यटन व मनोरंजन प्रकल्प असल्याने त्याचा विकास व्हावा, मात्र त्याचवेळी नागरिकांची सुरक्षितता, दर्जेदार सुविधा आणि पारदर्शक नियोजन यांना सर्वोच्च प्राधान्य मिळावे, अशी काटे यांची भूमिका आहे. अधिकृत माहिती व प्रस्तावित प्रकल्पाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट होईपर्यंत मुदतवाढीचा निर्णय घेऊ नये, अशी स्पष्ट विनंती त्यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

> “अप्पू घर हा पिंपरी-चिंचवडकरांच्या जिव्हाळ्याचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा विकास आणि आधुनिकीकरण व्हावे, ही आमचीही भूमिका आहे. मात्र, नागरिकांच्या आणि विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होता कामा नये. प्रस्तावित उपक्रम, साहसी खेळ, खेळणी, तांत्रिक नियोजन, सुरक्षा मानके, उपकरणांची गुणवत्ता आणि आवश्यक शासकीय परवानग्या याबाबत महापालिकेने पूर्ण पारदर्शकता ठेवावी. तज्ज्ञ आर्किटेक्ट, डिझायनर आणि संबंधित क्षेत्रातील अनुभवी संस्थांचा अधिकृत सल्ला घेतल्याशिवाय प्रकल्पाला मुदतवाढ किंवा पुढील मान्यता देऊ नये. संपूर्ण माहिती आणि सुरक्षा व्यवस्था स्पष्ट झाल्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा, ही आमची ठाम भूमिका आहे.”
>
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा)**

# एआय इनोव्हेशन क्लब”चे थाटात उद्‌घाटन; एआय व्हिडिओ मेकिंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी येथे “एआय इनोव्हेशन क्लब” या नवीन उपक्रमाचे रविवारी थाटात उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात सर्व शाखांतील सुमारे ९४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.**



महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी क्लबच्या उद्दिष्टांची आणि आगामी वर्षभराच्या नियोजित उपक्रमांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते एआय तज्ज्ञ श्री. तुषार कुटे यांचे मार्गदर्शन. “एआय युग सुरू झाले आहे — तुम्ही भविष्यासाठी तयार आहात का?” या विषयावर बोलताना त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत तत्त्वे, विविध एआय साधने व त्यांचे उपयोजन, या क्षेत्रातील करिअर संधी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांनी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या समारोपाच्या सत्रात “एआय व्हिडिओ मेकिंग स्पर्धा” घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेले लघुपट सादर केले. संकल्पनेची स्पष्टता, सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि सादरीकरण या निकषांवर परीक्षकांनी प्रवेशिकांचे मूल्यमापन केले. स्पर्धेत एफ.वाय.एम.एस्सी. (आयटी)चा विद्यार्थी सोहम एम. पाटांगे याने प्रथम, तर एस.वाय. बी.एस्सी.(सीएस)ची विद्यार्थिनी पूनम कैलास काळे हिने द्वितीय क्रमांक पटकावला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्लब समन्वयक डॉ. कांचन राठी, विद्यार्थी कल्याण विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील महाजन आणि संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांचे मार्गदर्शन लाभले. “निर्माण करा. नवोन्मेष घडवा. एआयसह भविष्याची कल्पना करा!” या घोषवाक्यासह एआय इनोव्हेशन क्लबच्या आगामी उपक्रमांना विद्यार्थ्यांकडून मोठ्या उत्साहाने प्रतिसाद मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# महापालिकेचे जयंत्या व उत्सवांसाठी सर्वसमावेशक धोरण

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची घोषणा; आयोजनात पारदर्शकता आणण्यावर भर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत साजऱ्या होणाऱ्या विविध महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी आणि राष्ट्रीय उत्सवांच्या आयोजनात सुसूत्रता आणण्यासाठी आणि खर्चात पूर्ण पारदर्शकता ठेवण्यासाठी लवकरच एक सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात येणार आहे. स्थायी समितीच्या बैठकीत या महत्त्वपूर्ण विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबतचे प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.**




महापालिका क्षेत्रात वर्षभरात साजऱ्या होणाऱ्या महापुरुषांच्या जयंत्या, स्मृती दिन आणि राष्ट्रीय उत्सवांच्या खर्चाचा व आयोजनाचा हिशोब पारदर्शक राहावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे. यासाठी दरवर्षी एक निश्चित बजेट आणि वार्षिक निविदा प्रक्रिया राबवण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेच्या जनसंपर्क विभागामार्फत हे सोहळे आयोजित केले जातात. परंतु, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती असताना समितीला याबाबत कल्पना नसते. तसेच, कार्यक्रम आयोजनाबाबत स्थानिक नगरसेवक आणि महापालिकेचे पदाधिकारी यांना पूर्वकल्पना नसल्याची तक्रार होती. त्यामुळे, हे सर्व प्रकार थांबण्यासाठी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष, पक्षनेते, सर्वपक्षीय गटनेते व पदाधिकाऱ्यांच्या सूचनांचा आदर करून सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी. पुढील आठ दिवसांत याबाबत प्रस्ताव तयार करून सादर करावा, अशा सूचना यावेळी अभिषेक बारणे यांनी दिल्या.

### फेरनिविदा, उशिराने प्रस्ताव आणण्याच्या पद्धतीला आळा

प्रत्येक जयंतीच्या वेळी स्वतंत्रपणे कागदपत्रे तयार करणे, ऐनवेळी निविदा काढणे किंवा उशिराने प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी आणण्याची पद्धत या नव्या धोरणामुळे पूर्णपणे बंद होणार आहे. वार्षिक स्तरावर सर्व कार्यक्रमांचे नियोजन आधीच झाल्यास कार्यक्रमांच्या दर्जात वाढ होईल आणि प्रशासकीय वेळेचीही बचत होईल, असा विश्वास यादरम्यान व्यक्त करण्यात आला.

> "महापुरुषांचे विचार आणि कार्य भावी पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. मात्र, महापालिकेतर्फे साजऱ्या होणाऱ्या या महापुरुषांच्या जयंत्या, राष्ट्रीय उत्सव आणि विविध महोत्सवांच्या आयोजनामध्ये कोणतीही अनियमितता किंवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. प्रत्येक कार्यक्रमाचा हिशोब पारदर्शक असावा आणि वेळेवर निविदा प्रक्रिया न झाल्यामुळे ऐनवेळी होणारी धावपळ टाळण्यासाठी आपण हे सर्वसमावेशक धोरण आणत आहोत. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यातील आगामी उत्सवांपासूनच या मानक कार्यपद्धतीची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, जेणेकरून हे सर्व सोहळे अधिक शिस्तबद्ध, देखणे आणि दर्जेदार पार पडतील."
>
> **- अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महापालिका**

### ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांतील नियोजनावर भर

नव्या धोरणाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यासाठी आगामी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांत येणाऱ्या महामानवांच्या जयंत्या व स्मृती दिनांचे नियोजन आत्तापासूनच करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. या सर्व कार्यक्रमांसाठी एक सोपी आणि कार्यक्षम कार्यपद्धती तयार केली जाणार असून, त्यानुसारच सर्व आयोजन पार पाडले जातील. जयंत्या व राष्ट्रीय उत्सवांच्या आयोजनात एकरुपता आणून महापालिकेच्या माध्यमातून हे सोहळे अधिक भव्य आणि सुसंस्कृत पद्धतीने पार पाडण्यासाठी हे धोरण अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# काळभोर नगरातील ५३ महिला बनल्या उद्योजकतेच्या दिशेने सक्षम!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी बनवून त्यांना उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने काळभोर नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या २६ दिवसीय सूक्ष्म कौशल्य उद्यमिता विकास कार्यक्रमाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या प्रशिक्षणाचा लाभ ५३ महिलांनी घेतला.**




नगरसेविका वैशालीताई काळभोर, नगरसेवक प्रमोद कुटे, नगरसेविका अरुणाताई लंगोटे, युवा नेते विशाल काळभोर यांच्या व भारतीय उद्यमिता विकास संस्थान (EDII), ॲक्सेंचर आणि WE-Act यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), पुणे आणि दीपस्तंभ लोकसंचालित साधन केंद्र, भोर यांच्या सहकार्याने "मिलेट्स प्रॉडक्ट्स – कुकीज, केक व मसाला प्रक्रिया" या विषयावर हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रमाणपत्र वितरण समारंभाला विशाल काळभोर, अनुराधाताई काळभोर, माविम पुण्याच्या अध्यक्ष श्वेता देवकर, उपाध्यक्ष सारिका जावळे, बाळासाहेब मुळे, सीएमआरसी भोसरीचे व्यवस्थापक निलेश साबळे, माविमच्या लेखापाल स्नेहल ठुबल, आकुर्डीच्या एरिया को-ऑर्डिनेटर ज्योती मुकेश हेळवे, भोसरीच्या एरिया को-ऑर्डिनेटर पल्लवी गुळवे, ट्रेनर अमृता गोडसे, सहयोगिनी मनीषा शिर्के, तसेच EDII चे प्रोजेक्ट ऑफिसर भगवान हरकळ आणि मिशन स्वावलंबन लोकसंचालित साधन केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते.

EDII, ॲक्सेंचर, WE-Act आणि माविम यांच्या माध्यमातून महिला उद्योजिकांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, उद्योग उभारणीसाठी सहाय्य, बाजारपेठेशी जोडणी आणि शाश्वत व्यवसायासाठी आवश्यक परिसंस्था उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

# उच्च शिक्षणाकडून उज्ज्वल भविष्याकडे



**नवी स्वप्ने, नव्या आशा मनाशी बाळगून आता आपण वाट पाहत आहोत ती महाविद्यालयाच्या प्रवेशाची. पालक आणि विद्यार्थी सर्वांना वेध लागले आहेत ते महाविद्यालय निवडीचे. मला असे आवर्जून इथे सांगावेसे वाटते की जसे आपण कोणते महाविद्यालय निवडायचे ते तेथे उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी यावर ठरवितो तसेच या सर्वांचा वापर स्वतःसाठी कसा करून घ्यावयाचा याचाही विचार करायला हवा.**

आजपर्यंत फक्त गुणवत्तेभोवती फिरणाऱ्या आपल्या मनाला काहीतरी नवीन करण्याची ओढ लागलेली असते आणि सुरू होतो एक नवा प्रवास म्हणजेच शोध नविन्याचा. नवे आकाश, नवे पंख, आणि नव्या उत्साहाने भरून गेलेली तरुण मने शोधू लागतात नव्या वाटा ज्या त्यांच्या मधील सुप्त कलागुणांना वाव देतील.युवा विद्यार्थी' हे संबोधन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वापरले जाते. स्वामी विवेकानंदांच्या मते युवक हे असामान्य ऊर्जेचे प्रतीक आहेत ज्यांच्यामध्ये परिवर्तनाची अमर्याद शक्ती असते ज्याद्वारे ते उज्वल भविष्यातील निर्मिती करतात. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना युवक म्हणजे देशाची मोठी ताकद वाटते. महात्मा गांधींच्या मते चारित्र्यवान युवक देशाच्या प्रगतीमध्ये अमूल्य असे योगदान देतात. महाविद्यालयीन शिक्षण हे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक ज्ञानाबरोबरच आत्मसन्मान, आत्मविश्वास, विचारशक्ती, सामाजिक जाणीव, संवेदनशीलता विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देते. एनईपी २०२० मुळे विद्यार्थ्यांना मुख्य विषयाबरोबरच इतर शाखेतील विषय उपविषय म्हणून घेता येतात. याचा फायदा असा आहे की त्यांना केवळ एकाच विषयाचे ज्ञान न राहता इतर विषयांचेही ज्ञान प्राप्त होते. विविध विषयांची माहिती मिळते. यालाच आपण 'बहुविद्याशाखीय शिक्षणाची संधी' म्हणून पाहतो. तसेच, बहुविध कौशल्ये विकसित करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध होतात. उच्च शिक्षण घेत असताना स्थानिक ते वैश्विक हा प्रवास करण्याची संधी अनेक महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहे. या संधीचा उपयोग करून विद्यार्थी परदेशी विद्यापीठांना, उद्योग क्षेत्राला भेट देऊ शकतात. अशा भेटींमधून शैक्षणिक, सांस्कृतिक, संशोधनात्मक विचारांचे आदान – प्रदान होते. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य, नेतृत्व क्षमता, सहकार्य अशा गुणांचा विकास होतो. परदेशी कार्यसंस्कृतीची ओळख होते. उच्च शिक्षण हा मानवी जीवनातील सुवर्ण काळ मानला जातो. इथे विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. उच्च शिक्षण हे एक असे व्यासपीठ आहे जिथे कलागुण सादर करता येतात, तज्ज्ञ आणि अनुभवी लोकांचे मार्गदर्शन मिळते, सामाजिक प्रकल्पांमध्ये सहभागी होता येते, नवीन कल्पनांचे सादरीकरण करता येते, संशोधनात्मक विचारांना पाठबळ मिळते, कार्यक्रमाचे नियोजन ते अंमलबजावणीपर्यंतचा अनुभव घेता येतो. थोडक्यात सांगायचे तर विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्यासाठी उच्च शिक्षण हा एक सर्वोत्तम काळ आहे. बदलती जीवनशैली, आव्हाने, स्पर्धा या सर्वांचा ताण विद्यार्थ्यांच्या मनावर येत असतो. त्यांची भावनिक आणि मानसिक शक्ती वाढवण्यासाठी सकारात्मक विचारांची, आत्मविश्वासाची गरज असते. विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणामधील सक्रिय सहभाग हा त्यांना एक सक्षम आणि परिपूर्ण व्यक्तिमत्त्व बनविण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतो.

यामध्ये पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. जागरूक, संवेदनशील, वास्तववादी आणि अभ्यासू दृष्टिकोनातून विचार करून आपल्या पाल्याला आवडेल अशा क्षेत्राची निवड करण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या मुलाची किंवा मुलीची क्षमता, त्यांच्या करिअरबाबतचे विचार, भविष्यासाठी त्यांनी आखलेले नियोजन आणि एकंदरीत त्यांचा दृष्टिकोन याविषयी मोकळेपणाने संवाद साधणे गरजेचे आहे. परस्परांमधील मतभेद वादविवादाने सोडविण्याऐवजी समंजसपणे आणि संवादाच्या माध्यमातून सोडविण्यावर भर दिला पाहिजे. आपल्या मुला-मुलीचे उज्वल भविष्य हे त्यांच्या आवडी, क्षमतांचा योग्य सन्मान आणि सर्वांच्या सहकार्याने आनंदाने घडले पाहिजे.

सर्व तरुण वर्गाला मला आवर्जून असे सांगावेसे वाटते की, उच्च शिक्षण म्हणजे केवळ एक पदवी प्राप्त करण्याचा प्रवास नसून, उज्वल भविष्याची भक्कम पायाभरणी करण्याची सुवर्णसंधी आहे. आपल्या ज्ञानात, कौशल्यांमध्ये, मूल्यांमध्ये आणि आत्मविश्वासात सातत्याने वाढ करणे हीच खऱ्या यशाची सुरुवात आहे. आपली आवड, क्षमता आणि आजच्या काळातील गरजा यांचा सखोल विचार करून योग्य अभ्यासक्रमाची निवड करणे आवश्यक आहे. इतरांच्या प्रभावाखाली न जाता स्वतःच्या ध्येयाला साजेसा मार्ग निवडणे अधिक महत्त्वाचे आहे. आजचे युग हे सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे आणि नव्या संधींचे आहे. त्यामुळे नवीन गोष्टी शिकण्याची तयारी, सतत ज्ञान अद्ययावत ठेवण्याची वृत्ती आणि बदल स्वीकारण्याची मानसिकता प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), डेटा ॲनालिटिक्स, डिजिटल टूल्स, सायबर सुरक्षा, उद्योजकता यांसारख्या नव्या क्षेत्रांची माहिती करून घेऊन त्यामधील कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यशस्वी करिअर घडविताना वेळेचे आणि कामाचे योग्य नियोजन, शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी, ताणावाचे योग्य व्यवस्थापन आणि सकारात्मक दृष्टिकोन यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि उत्तम व्यक्तिमत्त्व यांचा समतोल विकास आवश्यक आहे. शिक्षण ही सर्वांची एक सामूहिक जबाबदारी आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्र येऊन परस्पर सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थी हा ज्ञानार्जनासाठी सदैव उत्सुक आणि जिज्ञासू असला पाहिजे. त्यासाठी योग्य वेळी योग्य व्यक्तींचे मार्गदर्शन घेण्याची तयारी त्याच्यात असणे आवश्यक आहे. तसेच, निरंतर शिकण्याची वृत्ती आणि नवीन ज्ञान आत्मसात करण्याची इच्छा कायम जोपासली पाहिजे. आपल्यामधील कौशल्यांचा विकास करण्यासाठी विविध स्तरांवर सक्रिय राहिले पाहिजे. सांस्कृतिक, शैक्षणिक, संशोधनात्मक, व्यावहारिक, तांत्रिक कौशल्ये विकसित करावयाला हवीत. आजीवन शिक्षणाची तयारी हीच बदलत्या काळात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली आहे.

स्वतःचे भविष्य घडविताना आपल्या प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल कृतज्ञतेची भावना मनात असली पाहिजे. आपल्या यशामागे पालक, शिक्षक, कुटुंबीय, मित्र आणि मार्गदर्शक यांचे मोलाचे योगदान असते. त्यामुळे त्यांच्या सहकार्याचे ऋण सदैव मान्य ठेवणे हीच खरी माणुसकी आहे. जीवनाचा हा प्रवास करताना प्रत्येक व्यक्तीसोबत जपलेल्या गोड आठवणींची शिदोरी घेऊन उंच आकाशामध्ये झेपावण्यासाठी आपण नक्कीच तयार होतो. उच्च शिक्षणातून सुरू केलेला प्रवास आपल्याला घेऊन जातो एका उज्वल भविष्याकडे.

**लेखक परिचय**
**डॉ. पद्मावती एस. उंडाळे**
**सहयोगी प्राध्यापिका**
**व आंतरराष्ट्रीय संबंध अधिकारी, एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पुणे.**

# डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय शोधनिबंध परिषदेचे आयोजन

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दिनांक 3 आणि 4 सप्टेंबर 2026 रोजी IEEE International conference on Electronics, Computing, Communication and Networking Automation टेक्नॉलॉजिस (ICEC2NT-2026) चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे प्राचार्या डॉ. पी मालती यांनी दिली.**




तब्बल 250 शोधनिबंध या कॉन्फरन्स मध्ये सादर केले जाणार आहेत. भारताच्या विविध राज्यातून विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधक, तसेच अमेरिका, सौदी अरेबिया व इराक या देशातील विविध रिसर्च स्कॉलर्स आपले संशोधन या कॉन्फरन्स मध्ये सादर करणार आहेत.

सदर परिषदेसाठी डॉ. मनीष बाली आणि श्री मयूर कौलवकर बंगळुरू, साउथ फ्लोरिडा अमेरिकेवरून प्रा. भुवन उन्हेलकर, वेल्स विद्यापीठ युनायटेड किंगडम वरून प्रा. इझेंडू अरिवा, फिलिप्स इंडिया चे डायरेक्टर श्री आशिष शहा ,VJTI मुंबई चे प्रा. डॉ. फारुख काझी, IEEE पुणे चे प्रमुख डॉ अमर बुचडे, तसेच संस्थेचे विश्वस्त माननीय श्री तेजस पाटील यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

वरील सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मुळे कॉन्फरन्स मध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन कल्पना, संशोधन आणि ज्ञानाची देवाण-घेवाण होईल. सॉफ्ट ब्रँचेस जसे की कॉम्प्युटर, IT, याचा उपयोग Core branches जसे की इलेक्ट्रॉनिक्स आणि Instrumentation Engg मधील विद्यार्थ्यांना निश्चित होईल असे प्रतिपादन कॅम्पस डायरेक्टर Rear Admiral अमित विक्रम यांनी केले.

प्रा. डॉ. पी. मालती, प्रा डॉ बी बी मुसमाडे, प्रा डॉ ऋतुजा देशमुख आणि प्रा डॉ प्रिती पाटिल हे कॉन्फरन्सचे संयोजक म्हणून काम पाहत आहेत. सदर परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी, डी वाय पाटील आकुर्डी संकुला चे चेअरमन मा. सतेज पाटील, डॉ. डी वाय पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. तेजस पाटील, सौ. स्नेहा तेजस पाटील, आणि डॉ. डी वाय पाटील शैक्षणिक संकुलनाचे संचालक रियर एडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.